**॥ श्री ॥**

## <u>विचारधारा :- [ VISION ]</u>

श्री दत्तगुरूंचे प्रत्यक्ष दर्शन आणि अनुग्रह लाभलेल्या आद्यसद्गुरू श्री नारायण महाराज जालवणकरांचे पुण्यस्मरण करून सद्भक्ती पंथाची विचारधारा आणि हेतू स्पष्ट करण्याचा अल्पसा प्रयत्न करीत आहोत.

अल्पसा हा शब्द मुद्दामहून वापरला आहे, कारण आद्यसद्गुरूंच्या उच्च, उदात्त विचारांची झेप गगनाला गवसणी घालणारी, संपूर्ण ब्रह्माण्डव्यापक आहे. ती शब्दांकित करणे म्हणजे गंगामातेच्या अथांग आणि विस्तृत पात्रातून एक कमंडलू भरून जल उपासण्यासारखे आहे.

त्यांच्याच आणि मोजक्या शब्दात सांगायचे झाल्यास साध्य काय करायचे? तर :-

**पाहीन दत्ता तुझे चरण । ऐसा माझा हेतू जाण ।**
**वेगे दावी आता चरण । वागमृतें तोषवी ॥**

हे सहज, सुलभ रितीने साधण्या करितां सद्भक्ती पंथाची स्थापना प. पु. श्री टाकी महाराजांनी केली. हा सद्भक्ती पंथ **परमगुरु श्री दत्तगुरूंच्या** मार्गदर्शनाखाली आणि कृपाछत्राखाली आपली आध्यात्मिक वाटचाल करीत आहे.

वास्तविक पाहता पंथ म्हटल्यावर काही ठराविक, विशिष्ट लोकांचा समुदाय, जो एखाद्या कुठल्यातरी तत्वाचा पाठपुरावा करीत असतो. हा असा समुदाय मर्यादित स्वरूपाचा असतो, किंवा असू शकतो.

सद्भक्ती पंथ हा कुणाकरिता आहे?

तर संसार, व्यवहार करणाऱ्या कुटुंबवत्सल माणसांकरिता. अर्थात, हा पंथ सर्वसमावेशक आहे. जरी पंथ हा शब्द वापरलेला असला तरी हा पंथ संपूर्ण मानव जाती करितां आहे. येथे देश, धर्म, जात, उपजात ह्यांना अजिबात महत्व नाही. जो माणूस आहे तो सद्भक्ती पंथ स्वीकारू शकतो.

त्यातही संसार, व्यवहार करणाऱ्या लोकांकरिता का? संत म्हणतात :-

जो संसारदुःखे दुखावला । विविध तापे पोळला ।
तोचि अधिकारी जाला । परमार्थासी ॥

मग ह्यावर उपाय काय?

तर आद्य सद्गुरू श्री नारायण महाराज आणि प. पु. सद्गुरू श्री टाकी महाराज ह्यांनी सांगितलेला सहज, सोपा उपाय म्हणजे **भगवद्भजन.**

समर्थ श्री रामदास स्वामी म्हणतात :-

करावे गुणानुवाद कीर्तन ।
या नांव भगवद्भजन ॥

परंतु हे भगवद्भजन योग्य प्रकारे झाले पाहिजे. तरच त्याचा उपयोग. आदर्श भगवद्भजन म्हणजे काय?

सत्संगतीत झालेले भगवद्भजन मच्चीत्ता मत्प्राणा - भग्वदगीता - अ. १० श्लोक ९ - असे खुद्द भगवंतानेच म्हणून ठेवले आहे. जे भगवद्भजन खुद्द भगवंताच्या चरणाशी रुंजी घालते, तेच आदर्श भगवद्भजन.

पण ह्या करितां सत्संगती हवी. सत्संगतीशिवाय आदर्श भगवद्भजन अशक्य. सत्संगती कशी साधायची? ती सुद्दा अखंड?

नामस्मरण. अखंड नामस्मरण - हाच उपाय प. पु. सद्गुरूंनी सांगितला आहे आणि भगवंताचे अखंड नाम हीच सत्संगती असे म्हणून सत्संगतीचे महत्व विस्ताराने सांगितले आहे.

इतर उपाय, म्हणजे, पूजा-अर्चा, व्रत-वैकल्य, यज्ञ-याग, तीर्थाटन, हे सर्व गौण ठरतात.

कारण सृष्टीच्या त्या रचयित्याला आपण काय देणार?

श्री तुकाराम महाराज म्हणतात

काशीयाने पूजा करू केशिराजा । हाचि संदेह माझा फेडी आता ॥

फळ, फुल, अन्न, वस्त्र, धातू, अगदी जल देखील तुझेच रूप आहे.

मग तुला द्यायचे तरी काय?

म्हणून शेवटी म्हणतात :-

तुका म्हणे मज अवघे तुझे नाम । धूप दीप राम-कृष्ण-हरी

भक्ती, ज्ञान, वैराग्य - अध्यात्मातील वाटचालीचे तीन आधारस्तंभ. सामान्य जनांकरिता मात्र हे एक कोडे.

हे कोडे प. पु. श्री टाकी महाराजांनी अतिशय सहजरित्या उलगडून दाखवले आहे, असा अनुभव सद्भक्ती पंथातील सद्भक्तांना निश्चित येतो.

कसा? तर मुळात सद्भक्ती ह्या शब्दाची फोड करून दाखवली आहे.

सद्भक्ती - सत् भक्ती. अर्थात सत्ययुक्त, म्हणजेच ज्ञानयुक्त भक्ती, ह्यावर भर आहे.

व्यवहारात आणि भक्तिमार्गात जे काही कराल ते समजून, उमजून करा. रूढी, परंपरांचा आदर असावा पण आग्रह नसावा. कालबाह्य रूढींना तिलांजली आणि नवोन्मेषाचे सर्वपरी स्वागत ह्यानेच सद्गुरुंच्या उपदेशाची जपणूक होईल आणि तो उपदेश भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवता येईल.

भगवंताची, श्री सद्गुरूंची सेवा कशी करावी? तर प्रीतीपूर्वक, प्रेमपूर्वक. भजतां प्रीतीपूर्वकम् - प्रीतीपूर्वक भजनाचे महत्व सांगून प. प. सद्गुरू भगवंताकडे काय मागतात?.

हरी तुझी भक्ती मला देई । प्रभो तुझी प्रीती मला देई ॥

अशी भक्ती साधून भगवंताची, श्री सद्गुरूंची प्रीती प्राप्त करून शेवटी स्वतः: साठी काही नाही पण संपूर्ण जगतासाठी सद्भक्ती पंथातर्फे मागणे केले आहे :-

**घाली पंखाखाली सद्गुरुमाऊली । करोनि साउली कृपेची गे ॥**

**ओम श्री गुरुदेव दत्त !**